## निवडक



शिवोली : सिया संग्राम हळदणकरचा सन्मान करताना आमदार डिलायला लोबो. सोबत महिला.

### सिया संग्राम हळदणकरचा सन्मान

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १७ :** राय शिवोली येथील श्री दाडोबा देवस्थानतर्फे सिया संग्राम हळदणकरचा सन्मान करण्यात आला. आमदार डीलायला लोबो यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. देवस्थानच्या वर्धापन दिन निमित्त महिलांनी एका विशेष कार्यक्रमाचे सादरीकरण केले होते. या कार्यक्रमाला हळदणकर यांनी मार्गदर्शन केले होते. यावेळी आमदारांनी महिलांच्या कार्याची प्रशंसा केली. महिलांसाठी आपण नेहमीच सहकार्य करणार असल्याचे आमदार लोबो यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमात व्यासपीठावर सरपंच संदेश हडफडकर, पंचायत सदस्य अभय शिरोडकर, शर्मिला वेर्णेकर, अमित मोरजकर, देवस्थान अध्यक्ष वंदना गोवेकर व स्थानिक शामराव रायकर उपस्थित होते.

### हरमल येथे शिमगोत्सवनिमित्त १९ रोजी 'सह्याद्रीचा सिंह नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १७ :** शिग्मोत्सवनिम्मित तिसरे नाट्यपुष्प वर्ष पद्धतीप्रमाणे श्री राष्ट्रोळी ब्राह्मण कलानिकेतन कोरकणवाडातर्फे, संताजी घोरपडे यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक ३ अंकी 'सह्याद्रीचा सिंह' नाटक बुधवार दि. १९ रोजी रात्री १० वाजता, हरमल देऊळवाडा श्री देव रवळनाथ मंदिर प्रांगणात होणार आहे. या नाटकाचे निर्माते आत्माराम कोरकणकर, दिग्दर्शक सूर्यकांत कोरकणकर, संगीत दिग्दर्शन राजू बर्वे व देवेंद्र केपकर, पार्श्वसंगीत सत्यवान नाईक, सूत्रधार प्रभाकर बांधकर अरुण बांध कर, सुनील कोरकणकर, ध्वनी शिरोडकर साऊंड सिस्टीम बांदा, रंगमंच सोपटे रंगमंच पार्से यांची आहे. या नाटकात सागर कोरकणकर,शशिकांत कोरकणकर,दत्ता कोरकणकर,अमित कोरकणकर, प्रकाश (बंटी) कोरकणकर,साईनाथ कोरकण कर,संदेश कोरकणकर,नेहाल बांधकर, संतोष कोरकणकर, राजेश कोरकणकर, ऋग्वेद बांधकर, शुभम बांधकर, शारदा शेटकर, दीक्षा वेंगुर्लेकर, तसेच रूद्र अमित कोरकणकर, रूद्र आदित्य मोंडकर, तन्मय यशवंत बांधकर, अवनिश मनोज कोरकणकर, पार्थ प्रकाश हरमलकर, यातिश योगेश कोरकणकर व पर्श प्रकाश कोरकणकर व आनंद कोरकणकर यांच्या भूमिका आहेत.तरी नाट्यरसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री राष्ट्रोळी ब्राह्मण कला निकेतन संस्थेने केले आहे.

### सुनंदाबाई बांदोडकर विद्यालयात दत्ता नाईक यांना श्रद्धांजली

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. १७ :** येथील प्रबोधन शिक्षण संस्था संचालित श्रीमती सुनंदाबाई बांदोडकर विद्यालयात दिवंगत प्रा. दत्त नाईक यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका ज्योती चिवळूणकर यांनी माहिती दिली. चिवळूणकर म्हणाल्या की, दत्त नाईक हे गोव्याच्या स्वातंत्र्य लढ्याचे प्रत्यक्ष दर्शक, लेखक, कवी, वत्ते म्हणून गोव्यातच नव्हे तर संपूर्ण भारतात प्रसिद्ध होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बालपणापासूनचे स्वयंसेवक तसेच गोव्यातील संघकामाचे प्रमुख म्हणून ख्याती होती. गोवा प्रदेशातील अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य त्यांच्या मार्गदर्शनानुसार वाढले.
१९८७ साली विद्या प्रबोधिनी शाळेच मुहूर्तमेढ रोवली. हिंदू स्टडीज या विषयावर हिमाचल प्रदेश विश्वविद्यालयातर्फे एम. फील. पदवी प्रदान करण्यात आली होती. तसेट चार महिन्यापूर्वी आंध्र प्रदेश विश्वविद्यालयतर्फे तत्त्वाज्ञान विषयात मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली होती.

### चित्पवन ब्राह्मण संघाचा ३० रोजी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १७ :** चित्पवन ब्राह्मण संघ गोमंतकचा ३१वा वर्धापनदिन कार्यक्रम रविवार दि. ३० रोजी म्हणजेच दुढीपाडव्याच्या दिवशी दुपारी ३.१५ वाजता कुळण–साखळी येथील देवी योगेश्वरी मंदिराच्या प्रांगणात साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या ज्येष्ठ व्यक्तींचा सत्कार करण्यात येणार आहे. यामध्ये शिवराम वझे (मये), विष्णू जोशी (बांबर), शैलजा जोशी (साखळी), अन्नपूर्णा मराठे (चिरेव्हाळ), ÷उल्हास जोशी यांचाही सन्मान करण्यात येईल. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विश्वनात जोशी (फोंडा) उपस्थित राहणार आहेत, असे चित्पावन ब्राह्मण संघ, गोमंतकचे अध्यक्ष दीपक मराठे यांनी कळविले आहे.

# मुंबईत आयपीएल कर्णधारांची २० रोजी बैठक

## 'आयपीएल-२०२५' २२ पासून सुरू होणार | ६५ दिवसांत ७४ सामने खेळणार

**मुंबई, दि. १७ :**

इंडियन प्रीमियर लीगच्या सर्व संघांचे कर्णधार गुरुवार दि. २० रोजी मुंबईत प्री–सीझन बैठकीसाठी एकत्र येतील. क्रिकबझच्या रिपोर्टनुसार, ही बैठक दुपारी बीसीसीआय मुख्यालयात होईल. या कार्यक्रमात कर्णधारांव्यतिरिक्त, सर्व १० फ्रँचायझींच्या व्यवस्थापकांनाही आमंत्रित करण्यात आले आहे.

बीसीसीआय आणि आयपीएल व्यवस्थापनाने सर्व फ्रँचायझींना ईमेल पाठवला आहे. त्यात एका तासाच्या बैठकीबद्दल बोलले आहे. या बैठकीत, संघांना आगामी हंगामातील नवीन बदलांची माहिती दिली जाईल. यानंतर ताज हॉटेलमध्ये एक कार्यक्रम होईल. हा संपूर्ण कार्यक्रम चार तासांचा असेल. या काळात सर्व कर्णधारांचे फोटोशूट देखील होईल.



आयपीएल–२०२५ २२ मार्चपासून सुरू होणार आहे. लीगच्या १८व्या हंगामाचा पहिला सामना कोलकाता येथे गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) यांच्यात खेळला जाईल. यावेळी ६५ दिवसांत ७४ सामने खेळवले जातील. १८ मे पर्यंत ७० लीग स्टेज सामने होतील, ज्यात १२ डबल हेडरचा समावेश असेल. म्हणजे दिवसातून १२ वेळा २ सामने खेळवले जातील. अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे होईल.

१३ ठिकाणी १० संघांमधील सामने अहमदाबाद, मुंबई, चेन्नई, बंगळुरू, लखनऊ, मुल्लानपूर (मोहाली), दिल्ली, जयपूर, कोलकाता, हैदराबाद ही १० संघांची होम ग्राउंड आहेत. याशिवाय, गुवाहाटी, विशाखापट्टणम आणि धर्मशाला यासह एकूण १३ ठिकाणी सामने खेळवले जातील.

या स्पर्धेत ६५ दिवसांत १३ ठिकाणी १० संघांमध्ये ७४ सामने होतील. गुवाहाटी हे राजस्थान रॉयल्स (आरआर) चे दुसरे होम ग्राउंड आहे, संघ येथे २ सामने खेळेल. संघ २६ मार्च रोजी कोलकाता आणि ३० मार्च रोजी चेन्नईशी येथे सामना करेल. धर्मशाला हे पंजाब किंग्ज (पीबीकेएस) चे दुसरे होम ग्राउंड आहे. संघ येथे ३ सामने खेळेल.


विशाखापट्टणम हे दिल्ली कॅपिटल्स (डीसी) चे दुसरे होम ग्राउंड आहे. संघ येथे २ सामने खेळेल. आयपीएल ही भारतातील एक फ्रँचायझी क्रिकेट स्पर्धा आहे. दरवर्षी मार्च ते मे दरम्यान टी–२० स्वरूपात हा सामना खेळला जातो. २००८ मध्ये ८ संघांसह त्याची सुरुवात झाली. अंतिम सामन्यात चेन्नईचा पराभव करून राजस्थानने पहिल्या हंगामाचे विजेतेपद जिंकले. मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांनी सर्वाधिक म्हणजे प्रत्येकी ५ जेतेपदे जिंकली आहेत. केकेआर हा ३ जेतेपदे जिंकणारा तिसरा सर्वात यशस्वी संघ आहे.

दिल्ली कॅपिटल्सने (डीसी) फाफ डु प्लेसिसला उपकर्णधार म्हणून नियुक्त केले आहे. २०२५ च्या हंगामासाठी झालेल्या मेगा लिलावात फ्रँचायझीने त्याला २ कोटी रुपयांना खरेदी केले. डीसीने सोमवारी त्यांच्या (ट्विटर) हँडलवर एक व्हिडिओ पोस्ट करून याची घोषणा केली. आयपीएल–२०२५ २२ मार्चपासून सुरू होणार आहे.

# 'आरसीबी'चा रजत पाटीदार कर्णधार

**मुंबई, दि. १७ :**

आयपीएलचा थरार २२ मार्चपासून पाहायला मिळणार आहे. पहिला सामना इडन गार्डन्सच्या मैदानावर कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुमध्ये रंगताना दिसणार आहे. आयपीएलच्या या हंगामात अनेक संघाना आपला नवा कर्णधार मिळाला आहे. कोलकाता आणि बेंगळुरुसुद्धा नवीन कर्णधारासह मैदान गाजवण्यासाठी उतरणार आहे. आरसीबीचा नवा कर्णधार हा रजत पाटीदार आहे. खरंतर या हंगामाचा कर्णधार हा विराट कोहलीच बनणार होता परंतु घोड कुठे अडलं ते जाणून घ्या.




रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएल २०२५ हंगामासाठी रजत पाटीदारला कर्णधार म्हणून नियुक्त केले. गेल्या हंगामापर्यंत फाफ डू प्लेसिस आरसीबीचा कर्णधार होता, पण आयपीएल मेगा लिलावापूर्वी आरसीबीने दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूला सोडले. यानंतर, विराट कोहली आरसीबीचा कर्णधार असेल असे मानले जात होते, परंतु रजत पाटीदारलो ही जबाबदारी मिळाली. आरसीबीने विराट कोहलीला कर्णधारपद का नाकारले? या प्रश्नाचे उत्तर आरसीबीचा यष्टीरक्षक फलंदाज जितेश शर्माने दिले आहे.

जितेश शर्मा म्हणाला की, रजत पाटीदार निश्चितच कर्णधार बनला पाहिजेत. या खेळाडूने अनेक वर्षे आरसीबीची सेवा केली. मी रजत पाटीदारसोबत खूप क्रिकेट खेळलो आहे. मी रजत पाटीदारला कर्णधार म्हणून नक्कीच मदत करेन. विराट कोहलीने स्वतः कर्णधार होण्याची ऑफर नाकारली. त्यानंतर रजत पाटीदारला कर्णधारपद मिळाले. विराटने स्वत: ऑफर नाकराली नाहीतर कोहलीच्या चाहत्यांना कोहलीला पुन्हा एकदा कर्णधारपद भुषवताना पाहायला मिळाले असते.

अलिकडेच, आयपीएल मेगा लिलावात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने यष्टीरक्षक फलंदाज जितेश शर्माला ११ कोटी रुपयांना जोडले. यापूर्वी पंजाब किंग्जने जितेश शर्माला रिलीज केले होते. आयपीएल मेगा लिलावात, जितेश शर्मासाठी पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात बोली युद्ध दिसून आले. जेव्हा जितेश शर्माची किंमत ७ कोटी रुपयांवर पोहोचली तेव्हा पंजाब किंग्जने राईट टू मॅच कार्ड वापरले, परंतु त्यानंतर आरसीबीने जितेश शर्माला ११ कोटी रुपयांना खरेदी केले.

### दिल्ली कॅपिटल्स डु प्लेसिसला उपकर्णधार

**मुंबई, दि. १७ :**



दिल्ली कॅपिटल्सने (डीसी) फाफ डु प्लेसिसला उपकर्णधार म्हणून नियुक्त केले आहे. २०२५ च्या हंगामासाठी झालेल्या मेगा लिलावात फ्रँचायझीने त्याला २ कोटी रुपयांना खरेदी केले. डीसीने सोमवारी त्यांच्या (ट्विटर) हँडलवर एक व्हिडिओ पोस्ट करून याची घोषणा केली. आयपीएल–२०२५ २२ मार्चपासून सुरू होणार आहे.

डु प्लेसिसने आतापर्यंत त्याच्या देशासाठी आणि जगभरातील फ्रँचायझींसाठी ४०४ टी–२० सामने खेळले आहेत. त्याने ३८३ डावांमध्ये ३२.६६ च्या सरासरीने ११,२३६ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये सहा शतके आणि ७८ अर्धशतके आहेत. डु प्लेसिसने १४५ आयपीएल सामन्यांमध्ये १३६ पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने ४,५७१ धावा केल्या आहेत. यामध्ये ३७ अर्धशतकांचा समावेश आहे. या काळात त्याची सर्वोत्तम धावसंख्या ९६ धावा आहे.

आयपीएल–२०२५ साठी अष्टपैलू अक्षर पटेल दिल्ली कॅपिटल्स संघाचा कर्णधार असेल. २०१९ पासून अक्षर दिल्ली कॅपिटल्सचा भाग आहे. तो दिल्लीचा सर्वात अनुभवी खेळाडू आहे. गेल्या ६ हंगामात त्याने संघासाठी ८२ सामने खेळले आहेत. ३० च्या सरासरीने २३५ धावा करण्यासोबतच त्याने ७.६५ च्या इकॉनॉमीने ११ विकेट्सही घेतल्या आहेत. तर, एका सामन्यात ऋषभ पंतला स्लो ओव्हर्ससाठी बंदी घालण्यात आल्यामुळे अक्षरने संघाचे नेतृत्व केले आहे. मात्र, या सामन्यात त्याला पराभवाचा सामना करावा लागला.

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) च्या १८ व्या हंगामाचा उद्घाटन सामना २२ मार्च रोजी कोलकाता येथे गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) यांच्यात होणार आहे. यावेळी ६५ दिवसांत ७४ सामने खेळवले जातील. १८ मे पर्यंत ७० लीग स्टेज सामने होतील, ज्यात १२ डबल हेडरचा समावेश असेल. म्हणजे दिवसातून १२ वेळा २ सामने खेळवले जातील. अंतिम सामना २५ मे रोजी कोलकाता येथे होईल.

# मल्लिकार्जुन देवस्थानात प्रसिद्ध तरंगोत्सव

## शिर्शारांधणी व शिगम्याच्या जत्रोत्सव : आजपासून सुरू



■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १७ :** श्रीस्थळ, काणकोण येथील श्री मल्लिकार्जुन देवस्थानच्या श्री अवतारपुरुष देवाची तरंगे, भगत, गडे व संपूर्ण लवाजम्याचे माघ महीन्यात उत्तर कर्नाटक भागात फिरुन आपल्या कुळावी व इतर भक्तांना कौलप्रसाद व आशीर्वाद देऊन आपल्या मुळस्थानी परतल्यानंतर काणकोण भागातील पारंपारिक ठिकाणी अवतार,कौल प्रसाद व पाद्यपूजा, तळ्या स्विकारून परत मूळ घरवईवर परतले. उद्या दि. १८ ते दि. २० रोजीपर्यंत श्रीस्थळ, येथील श्री मल्लिकार्जुन देवस्थानात जत्रौत्सव (शिमग्याची जत्रा) असून गुरुवारी दि. २० रोजी, शीर्षारांधणी उत्सवाने जत्रौत्सवाची सांगता होईल.

मंगळवार दि. १८ रोजी श्रीस्थळ येथील तळ्या घेउन अवतारपुरुषाचे तिनही मेळ आपआपल्या घरवईवर निघतील.ह्या दिवशी देवाला दिवज सेवा अर्पण करणाऱ्या सुहासीनी दिवजांचा उपवास पाळतील.

बुधवार दि. १९ रोजी, पहाटे तिन्ही घरवईवर अवतार व कौलप्रसाद होईल. श्री मल्लीकार्जुन मंदिर परीसरात सकाळी वेळीप, त्यानंतर किंदळेकर देसाई व नगर्सेकर देसाई कुटुंबियांच्या दिवजांच्या भोवरी होतील. रात्री ८.३० वाजता श्रींचा रौप्य शीबिकोत्सव, गुलालोत्सव, पाजीवरील सुवारी व नंतर खोलकर भावपूत बंधूतर्फे सुवारी वादन सादर केले जाईल.

गुरुवार दि. २० रोजी सकाळी श्रीस्थळ येथे नविन लग्न झालेल्या पुरुषासाठी शेली टोचून घेण्याचा विधी व शेलची भोंवर, तुलाभार व दुपारी दोन वाजता मंदिराच्या राजांगणात बहुसंख्य जनसमुदायाच्या उपस्थितीत अवतारपुरुषाचा अवसर व प्रसिद्ध शिर्शारांधणी उत्सव होईल व उशीरा गड्यांच्या विसर्जनाने षष्ठीच्या जत्रेची सांगता होईल.

समितीतर्फे सर्व भाविकांना आमंत्रित केले जात आहे व पारंपरिक बंधने पाळून सर्वांनी शिस्तीत व शांततेने देवाचे आशीर्वाद घ्यावे असे आवाहन देवस्थान समितीचे अध्यक्ष विठोबा देसाई व अन्य पदाधिकाऱ्यांतर्फे करण्यात आले आहे.

# मेळाव्यातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

## चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर : हरमल पंचक्रोशीत भाऊसाहेब बांदोडकर जयंती 'फन डे' साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड



हरमल : भाऊसाहेब बांदोडकर यांच्या तसबीरीस पुष्पहार अर्पण करताना चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर. सोबत मुख्याध्यापिका स्मिता पार्सेकर, समीर तीळवे, राघोबा गावडे, तन्वी नाईक, मिरा केपकर व इतर.

**हरमल, दि. १७ :** हरमल पंचक्रोशी संस्थेत आनंद मेळावा आयोजन करून विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना वाव तसेच निखळ आनंद देण्याचा प्रयत्न आहे.अश्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना आनंदातून शिक्षण लाभदायी ठरेल, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री तथा पंचक्रोशी शिक्षण संस्थेचे चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर यांनी व्यक्त केले.

सदर कार्यक्रम हायर सेकंडरीच्या राजांगणात साजरा केला. पहिले मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यांची जयंती व पूर्व प्राथमिक विभागातर्फे 'फन डे'अर्थात आनंद मेळावा, निमित्तच्या सोहळ्यात बोलत होते. भाऊसाहेब बांदोडकर यांची जयंती म्हणजे गोव्याच्या भूमीत कलाटणी देणारा क्षण आहे. शिक्षणाला प्राधान्य देत गावात व वाड्यावड्यवर शाळा सुविधा उपलब्ध केल्या. वंचित समाजाचा शिक्षणाचा पाया मजबूत केला. अल्पशिक्षित असूनही शिक्षणासारख्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली, त्याच्या दूरदृष्टीचा विकास अपेक्षित आहे, असे माजी मुख्यमंत्री पार्सेकर यांनी व्यक्त केले.

समाजाचे भवितव्य शाळेत घडत असते.त्यामुळे शिक्षणाचा पाया मजबूत असल्यास जीवन अर्थपूर्ण होईल.सद्या शिक्षण खात्याने नर्सरी, केजी, पहिली व दुसरी हे फाऊंडेशन विभाग म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे,सादर केलेल्या स्वागत गीतात,विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास दिसून आला.शाळेच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले व घेत आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य आहे. हरमल, पालये, केरी तसेच आरोंदा भागातील मुले फाऊंडेशनमध्ये प्रवेश घेऊन, हरमलच्या या संस्थेत अकरावी, बारावी तसेच शिक्षणशास्त्र महविद्यालय व नर्सिंग कॉलेज सुविधा असल्याने मुलांना प्रवेश घेत असले तरी या संस्थेत आधुनिक व उच्च अद्ययावत प्रयोगशाळा,स्मार्ट क्लासरूम व उच्च विद्या विभूषित अध्यापक वर्ग असल्याने शक्य आहे, असे पार्सेकर यानी नमूद केले. शाळा व्यवस्थापन उत्कृष्ठ कार्य करीत असून मुलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक उपक्रम राबवून मुलांत धीटपणा निर्माण करीत असल्याबद्दल समीर तीळवे यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी मुख्याध्यापिका स्मिता पार्सेकर यांनी प्रास्ताविक भाषणात फाऊंडेशन विभागाच्या पालक शिक्षक संघाने 'फन डे'ची संकल्पना मांडली होती.त्यानुसार नियोजन करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी हा उपक्रम सुरू केल्याचे,मुख्याध्यापिका पार्सेकर यांनी व्यक्त केले.अध्यक्ष समीर तीळवे,उपाध्यक्ष राघोबा गावडे, खजिनदार तन्वी नाईक,

उप खजिनदार गणेश वस्त, सचिव शिक्षिका प्रियांका हरमलकर,मिरा केपकर,संगीता कांबळी, जानवी इब्रामपुरकर, राजेश केरकर उपस्थित होते. लहान मुलांनी स्वागत गीत सादर केले, त्यांना दशरथ नाईक, रोहित कदम व जिग्नेश पेडणेकर यांनी साथ दिली. शिक्षिका नाईक यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन प्रियांका ठाकूर तर उपाध्यक्ष राघोबा गावडे यांनी आभार मानले.





वळवई : शिवजयंती उत्सवाचे उद्‌घाटन करताना दिलीप नाईक. बाजूस गौरेश तारी, विनायक वेंगुर्लेकर, मिताली शेट, अंजली वेंगुर्लेकर, सर्वेश नाईक, काशिनाथ नाईक, महादेव तारी, रत्नाकर तारी व निता तारी.

# शिवछत्रपती प्रतिष्ठानतर्फे वळवईत शिवजयंती उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १७ :** वळवई येथील श्री शिवछत्रपती प्रतिष्ठानतर्फे तारी सोसायटी, श्री गजांतलक्ष्मी संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तसेच गोवा पर्यटन संचालनालय पुरस्कृत तिथीनुसार शिवजयंती उत्सवाचे उद्‌घाटन मोठ्या थाटात झाले. हा कार्यक्रम श्री गजांतलक्ष्मी देवस्थानच्या आवारात पार पडला.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून बेतकी – खांडोळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान पंच दिलीप नाईक, मांडाचे गुरू गौरेश तारी, सरपंच विनायक वेंगुर्लेकर, उपसरपंच मिताली शेट, पंच अंजली वेंगुर्लेकर, सर्वेश नाईक, काशिनाथ नाईक, तारी सोसायटीचे सदस्य महादेव तारी, शिव प्रतिष्ठानचे अध्यक्ष रत्नाकर तारी, कार्यक्रम समितीच्या अध्यक्षा निता तारी उपस्थित होत्या.

दिलीप नाईक म्हणाले की, पूर्वी गावागावात ऐतिहासिक नाटके मोठ्या प्रमाणात व्हायची.या नाटकातून भारतीय इतिहासाची तसेच शिवाजी, संभाजी महाराजांच्या अतुलनीय कार्याची ओळखही व्हायची. परंतु आज ही ऐतिहासिक नाटके काही गावातच होताना दिसताहेत.वळवई गावाने मात्र ही ऐतिहासिक नाटकांची परंपरा अजूनही चालू ठेवलेली आहे.पुढच्या पिढीसाठी ही अत्यंत चांगली बाब आहे. वळवई गावाने ही परंपरा अशीच चालू ठेवावी, असे सांगितले. प्रास्ताविक रत्नाकर तारी यांनी केले. विनायक वेंगुर्लेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १९५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 195 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .